Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**B**

# ECONOMICS
# Paper-III

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) .................................................

2. (Signature) .........................................

(Name) .................................................

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## JAN - 11318

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्याय प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# ECONOMICS
## Paper III
# अर्थशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

Time Allowed : 2½ Hours] [Maximum Marks : 150

**Note** : This Question Paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना** : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. What can you say about the following statements ?

(*i*) Planning Commission in India was a statutory body.

(*ii*) Finance Commission in India is a permanent advisory body.

(A) Statement (*i*) is correct and statement (*ii*) is incorrect

(B) Statement (*i*) is incorrect and statement (*ii*) is correct

(C) Both the statements (*i*) and (*ii*) are correct

(D) Both the statements (*i*) and (*ii*) are incorrect

1. खालील विधानाबद्दल काय सांगाल ?

(*i*) भारतातील योजना आयोग वैधानिक संस्था होती.

(*ii*) भारतातील वित्त आयोग स्थायी सल्लागार मंडळ आहे.

(A) विधान (*i*) बरोबर आणि विधान (*ii*) चूक आहे

(B) विधान (*i*) चूक आणि विधान (*ii*) बरोबर आहे

(C) विधान (*i*) आणि विधान (*ii*) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत

(D) विधान (*i*) आणि विधान (*ii*) ही दोन्ही विधाने चूक आहेत

2. What can you say about the following statements ?

   (*i*) The share of rural incomes in India's GDP is falling during recent time.

   (*ii*) The share of organized sector in India's GDP is rising during recent time.

   (A) Both (*i*) and (*ii*) statements are incorrect

   (B) Statement (*i*) is correct and statement (*ii*) is incorrect

   (C) Both (*i*) and (*ii*) statements are correct

   (D) Statement (*i*) is incorrect and statement (*ii*) is correct

3. Global warming in the world is majorly due to :

   (A) Hot Summers

   (B) Green-house Effects

   (C) Erratic Summers

   (D) Irregular Monsoons

2. खालील विधानांबाबत तुम्ही काय सांगाल ?

   (*i*) नजीकच्या काळात भारताच्या देशांतर्गत राष्ट्रीय उत्पन्नातील ग्रामीण उत्पन्नाचा वाटा घटत आहे.

   (*ii*) नजीकच्या काळात भारताच्या देशांतर्गत राष्ट्रीय उत्पन्नातील संघटित क्षेत्राचा वाटा वाढत आहे.

   (A) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही चूक आहेत

   (B) विधान (*i*) बरोबर व विधान (*ii*) चूक आहे

   (C) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही बरोबर आहेत

   (D) विधान (*i*) चूक व विधान (*ii*) बरोबर आहे

3. जगातील तापमान वाढ मुख्यत: .................. यामुळे आहे.

   (A) तीव्र उन्हाळा

   (B) हरितगृह परिणाम

   (C) लहरी उन्हाळा

   (D) अनियमित पाऊसपाणी

4. Tarapore Committee was associated with which one of the following ?

(A) Special Economic Zones

(B) Full Capital Account Convertibility of Rupee

(C) Foreign Exchange Reserves

(D) Effect of oil prices on the Indian Economy

5. Fill in the blanks :

| Census of India | Literacy rate in India (percentage) |
|---|---|
| 1991 | ? |
| 2001 | ? |
| 2011 | ? |

(A) 52.2 64.8 74.1

(B) 50.1 62.0 70.3

(C) 55.5 65.5 76.7

(D) 54.2 66.8 76.1

4. तारापोर समिती खालीलपैकी कशाच्या संदर्भात होती ?

(A) विशेष आर्थिक क्षेत्र

(B) रुपयाची भांडवली खात्यावरील पूर्ण परिवर्तनीयता

(C) विदेशी मुद्रा साठा

(D) तेलाच्या किंमतीचे भारतीय अर्थव्यवस्थे-वरील परिणाम

5. गाळलेल्या जागा भरा :

| भारताची शिरगणती | भारतातील साक्षरता दर (टक्केवारी मध्ये) |
|---|---|
| 1991 | ? |
| 2001 | ? |
| 2011 | ? |

(A) 52.2 64.8 74.1

(B) 50.1 62.0 70.3

(C) 55.5 65.5 76.7

(D) 54.2 66.8 76.1

6. While production goes on, the Marginal Fixed Cost (MFC) is always :

(A) rising

(B) falling

(C) negative

(D) zero

7. The book "Value and Capital" is authored by :

(A) Tapas Majumdar

(B) R.G.D. Allen

(C) J.R. Hicks

(D) Joan Robinson

8. (*i*) An individual labour invariably shows backward bending supply curve.

(*ii*) Supply of labour to an industry shows high elasticity.

What can you say of these statements ?

(A) Both statements (*i*) and (*ii*) are correct

(B) Both statements (*i*) and (*ii*) are incorrect

(C) Statement (*i*) is incorrect and statement (*ii*) is correct

(D) Statement (*i*) is correct and statement (*ii*) is incorrect

6. उत्पादन चालू असताना सीमान्त स्थिर खर्च नेहमी .............................. असतो.

(A) वाढता

(B) घटता

(C) उणे

(D) शून्य

7. "व्हॅल्यु अँड कॅपिटल" हे पुस्तक .............. यांनी लिहिले आहे.

(A) तपस मजुमदार

(B) आर.जी.डी. ॲलन

(C) जे.आर. हिक्स

(D) जोन रॉबिन्सन

8. (*i*) एका व्यक्तिगत श्रमिकाचा पुरवठा वक्र निश्चितपणे मागे झुकणारा असतो.

(*ii*) एका उद्योगास होणारा श्रमिकांचा पुरवठा उच्च लवचिकता दर्शवतो.

या विधानांबाबत तुम्ही काय म्हणाल ?

(A) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही बरोबर आहेत

(B) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही चूक आहेत

(C) विधान (*i*) चूक व विधान (*ii*) बरोबर आहे

(D) विधान (*i*) बरोबर व विधान (*ii*) चूक आहे

9. In the long-run profit maximising firm will choose to exit a market when :

(A) Fixed costs exceed sunk costs

(B) Average fixed cost is rising

(C) Total Revenue (TR) from production is less than Total Cost (TC)

(D) Marginal cost is above average cost

10. Demand for factors of production is :

(A) Derived demand

(B) Joint demand

(C) Cross demand

(D) Net demand

9. दीर्घ काळामध्ये महत्तम नफा मिळवणारी उत्पादन संस्था त्या बाजारातून बाहेर पडण्याचा निर्णय खालीलपैकी कोणत्या स्थितीत घेते ?

(A) स्थिर खर्च बुडित खर्चापेक्षा अधिक आहेत

(B) सरासरी स्थिर खर्च वाढत आहेत

(C) उत्पादन प्रक्रियेतून मिळणारे एकूण उत्पन्न (TR) हे उत्पादन खर्च (TC) यापेक्षा कमी आहे

(D) सीमांत खर्च हे सरासरी खर्चापेक्षा अधिक आहेत

10. उत्पादन घटकांची मागणी ही ..................... असते.

(A) प्रेरित मागणी

(B) संयुक्त मागणी

(C) ढोबळ मागणी

(D) निव्वळ मागणी

11. Rigid money wage in complete Keynesian model generates :

(A) Downward sloping aggregate supply curve

(B) Upward sloping aggregate supply curve

(C) Vertical aggregate supply curve

(D) Horizontal aggregate supply curve

12. Choose the *right* answer from the options A to D given below :

**Assertion (S) :**

In the classical model, no equilibrium other than full-employment is possible.

**Reasoning (R) :**

This is ensured by a positively sloped AS curve and a negatively sloped AD curve.

(A) (S) is correct and (R) is correct

(B) (S) is correct and (R) is incorrect

(C) (S) is incorrect and (R) is correct

(D) (S) is incorrect and (R) is incorrect

11. परिपूर्ण केन्सप्रणित प्रतिमानात दृढ पैशातील वेतनामुळे खालीलपैकी कुठल्या बाबीची निर्मिती होईल ?

(A) सकल पुरवठा वक्र उतरता

(B) सकल पुरवठा वक्र चढता

(C) सकल पुरवठा वक्र क्षितिजलंब

(D) सकल पुरवठा वक्र क्षितिजसमांतर

12. खालीलपैकी **योग्य** पर्याय निवडा :

**विधान (S) :**

अभिजात प्रतिमानामध्ये पूर्ण रोजगार वगळता दुसरा कोणताही समतोल असू शकत नाही.

**कारण (R) :**

धन उताराचा समस्त पुरवठा वक्र व ऋण उताराचा समस्त मागणी वक्र यामुळे हे निश्चीत होते.

(A) विधान (S) व कारण (R) दोन्ही बरोबर आहे

(B) विधान (S) बरोबर पण कारण (R) चूक आहे

(C) विधान (S) चूक पण कारण (R) बरोबर आहे

(D) विधान (S) चूक व कारण (R) चूक आहे

13. In Mundell Fleming open economy model, if exchange rate is flexible, then fiscal policy is a failure because :

(A) Balance of payments is in deficit, currency depreciates and net exports go up

(B) Balance of payments is in deficit, currency appreciates and net exports go down

(C) Balance of payments is in surplus, currency appreciates and net exports go down

(D) Balance of payments is in surplus, currency depreciates and net exports go down

14. Which one of the following is *not* a determinant of money multiplier in an economy ?

(A) Currency to Deposit ratio

(B) Excess reserve ratio

(C) Required cash reserve ratio

(D) Consumption to currency ratio

13. मंडेल फ्लेमिंग खुल्या अर्थव्यवस्था प्रतिमानात विनिमय दर बदलता असल्यास राजकोषीय धोरण निष्प्रभ होते याचे कारण :

(A) आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद त्रुटीत असतो, चलनाची घसरण होते आणि निव्वळ निर्यातीत वाढ होते

(B) आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद त्रुटीत असतो, चलनाचे अधिमूल्यन होते आणि निव्वळ निर्यातीत घट होते

(C) आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद आधिक्यात असतो, चलनाचे अधिमूल्यन होते आणि निव्वळ निर्यातीत घट होते

(D) आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद आधिक्यात असतो, चलनाची घसरण होते आणि निव्वळ निर्यातीत घट होते

14. खालीलपैकी कोणता घटक अर्थव्यवस्थेतील पैसा गुणकाचा निर्णायक घटक **नाही** ?

(A) चलनाचे ठेवीशी असलेले प्रमाण

(B) अधिक राखीव प्रमाण

(C) आवश्यक रोख राखीव प्रमाण

(D) उपभोगाचे चलनाशी असलेले प्रमाण

15. Duesenberry's relative income hypothesis rests on the assumption that utility function of an individual is influenced by :
    - (A) Average consumption of the economy
    - (B) Marginal consumption of the economy
    - (C) Only lowest value of consumption of the economy
    - (D) Only highest value of consumption of the economy

16. Prof. Gunnar Myrdal combines national and international forces to discuss process of economic development on the basis of :
    - (A) Export and import potential
    - (B) Backwash effects and spread effects
    - (C) Income inequalities in the economy
    - (D) Demand and supply forces in the economy

15. ड्युसेनबेरीची सापेक्ष उत्पन्नानुसारी परिकल्पना या गृहितकृत्यावर आधारित आहे – व्यक्तीचे उपयोगिता फल ................................ या घटकाने प्रभावित होईल.
    - (A) अर्थव्यवस्थेचे सरासरी उपभोग
    - (B) अर्थव्यवस्थेचा सीमांतिक उपभोग
    - (C) अर्थव्यवस्थेतील उपभोगाचे मूल्य सर्वात कमी
    - (D) अर्थव्यवस्थेतील उपभोगाचे मूल्य सर्वात जास्त

16. प्रा. गुन्नार मिर्डाल यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शक्ती एकत्रित विचारात घेऊन आर्थिक विकास प्रक्रियेची चर्चा .............................. या शक्तींच्या आधारावर केली आहे.
    - (A) निर्यात व आयात संभाव्य
    - (B) प्रत्याधावी परिणाम आणि प्रसर परिणाम
    - (C) अर्थव्यवस्थेतील उत्पन्न विषमता
    - (D) अर्थव्यवस्थेतील मागणी शक्ती

17. According to Prof. Higgins the use of different production functions in advanced sector and traditional sector of an underdeveloped economy is referred as ........................ dualism.

(A) Financial

(B) Social

(C) Technical

(D) Credit

18. The concept of Physical Quality of Life Index (PQLI) was developed by :

(A) S. Kuznet

(B) R. Nurkse

(C) Arthur Lewis

(D) M.D. Morris

17. प्रा. हिगीन्स यांच्या मते, न्युनविकसित अर्थव्यवस्थेच्या प्रगत आणि पारंपरिक क्षेत्रात विविध उत्पादन फलनाचा उपयोग केल्यास त्यास ................................ द्विदलनावाद म्हणतात.

(A) वित्तीय

(B) सामाजिक

(C) तांत्रिक

(D) पत

18. 'भौतिक जीवनमान निर्देशांक' (PQLI) ही संकल्पना ............................ यांनी विकसित केली.

(A) एस. कुझनेट

(B) आर. नर्क्से

(C) आर्थर लुईस

(D) एम.डी. मॉरीस

19. ............................ techniques tend to accelerate the rate of capital formation and maximum productive capacity and employment in the long-run in developing countries like India.

(A) Capital intensive

(B) Labour intensive

(C) Appropriate technology

(D) Intermediate technology

20. The Gini coefficient provides a measure of :

(A) The level of poverty

(B) The level of relative income inequality

(C) The level of disguised unemployment

(D) The level of economic growth

19. भारतासाख्या विकसनशील देशात, दीर्घकाळात भांडवलनिर्मिती दर, कमाल उत्पादन क्षमता व रोजगार यांना .................................. या तंत्रज्ञानामुळे गती मिळते.

(A) भांडवल प्रधान

(B) श्रम प्रधान

(C) सुयोग्य तंत्रज्ञान

(D) मध्यम तंत्रज्ञान

20. 'गिनी सहगुणक' ................................ चे मापन करतो.

(A) दारिद्र्य पातळी

(B) उत्पन्न विषमतेची सापेक्ष पातळी

(C) छुप्या बेकारीची पातळी

(D) आर्थिक वृद्धीची पातळी

21. Tax buoyancy is measured as a ratio of :

(A) Growth in tax revenue to the growth in GDP

(B) Growth in non-tax revenue to the growth in gross tax revenue

(C) Growth in revenue to growth in total expenditure

(D) Growth in total expenditure to growth in GDP

22. 'Shifting of tax' is seen in case of ............................ taxes.

(A) Direct

(B) Indirect

(C) International

(D) Local

21. कराची उद्‌वर्धनशीलता .................... गुणोत्तरा आधारे मोजली जाते.

(A) कर महसूली वाढीचे सकल अंतर्गत उत्पादिताशी गुणोत्तर

(B) करेत्तर महसूल वाढीचे एकूण कर महसूल वाढीशी गुणोत्तर

(C) कर महसूल वाढीचे एकूण खर्च वाढीशी गुणोत्तर

(D) एकूण खर्च वाढीचे सकल अंतर्गत उत्पादितातील वाढीशी गुणोत्तर

22. 'कर संक्रमण' हे ...................... या प्रकारच्या करांमध्ये दिसून येते.

(A) प्रत्यक्ष कर

(B) अप्रत्यक्ष कर

(C) आंतरराष्ट्रीय कर

(D) स्थानिक

23. The concept of 'Zero Base Budget' was first used in :

(A) America

(B) Australia

(C) Germany

(D) France

23. शुन्याधारित अंदाजपत्रकाची संकल्पना प्रथमत: .......................... या देशात वापरली गेली.

(A) अमेरिका

(B) ऑस्ट्रेलिया

(C) जर्मनी

(D) फ्रान्स

24. The fiscal deficit is *not* financed through :

(A) Proceeds from State Provident Fund

(B) Treasury Bills

(C) Dated Securities

(D) Debt raised under Market Stabilization Scheme

24. राजकोषीय तुटीचे वित्तव्यवस्थात ................ मार्फत केले जात **नाही.**

(A) राज्य भविष्य निर्वाह निधीतील प्राप्ती

(B) राजकोषीय प्रपत्र

(C) दिनांकित प्रपत्र

(D) बाजार स्थिरीकरण योजनेअंतर्गत उभारलेले कर्ज

25. The proceeds collected under Article 271 of the constitution are retained by :

(A) State Governments

(B) Union Government

(C) Urban Local Bodies

(D) Rural Local Bodies

25. राज्य घटनेच्या कलम 271 अन्वये मिळणारी संकलित प्राप्ती .............................. स्वत: कडे बाळगतात.

(A) राज्य सरकारे

(B) केंद्र सरकार

(C) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था

(D) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था

26. **Statement I :**

Initial phase of trade liberalisation in India led to an increase in employment opportunities.

**Statement II :**

Later phase of trade liberalisation in India resulted into a Jobless growth.

(A) Both the Statement I and Statement II are correct

(B) Both the Statement I and Statement II are false

(C) Statement I is true but the Statement II is false

(D) Statement I is false but the Statement II is correct

27. In the Balance of Payment accounts, transfer payments are included in the :

(A) Current Account

(B) Service Account

(C) Capital Account

(D) Official Resources Account

26. **विधान I :**

भारतातील व्यापार उदारिकरणाचा सुरुवातीचा टप्पा रोजगार संधीच्या वाढित परिवर्तीत झाला.

**विधान II :**

भारतातील व्यापार उदारीकरणाचा नंतरचा टप्पा रोजगाररहीत वृद्धित परिवर्तीत झाला.

(A) विधान I व विधान II ही दोन्ही विधाने बरोबर आहेत

(B) विधान I व विधान II ही दोन्ही विधाने चूक आहेत

(C) विधान I बरोबर आहे परंतू विधान II चूक आहे

(D) विधान I चूक आहे परंतू विधान II बरोबर आहे

27. व्यवहार तोल लेख्यामध्ये हस्तांतरण प्रदान .............................. खात्यामध्ये समाविष्ट केली जातात.

(A) चालू खाते

(B) सेवा खाते

(C) भांडवली खाते

(D) अधिकृत संसाधन खाते

28. To which of the following would the mercantilists have objected ?

(A) Free trade

(B) Stimulating exports

(C) Restricting imports

(D) Accumulation of gold by their nation

29. **Statement I :**

International trade allows creation of an integrated market.

**Statement II :**

The international market which emerges as a result of international trade distorts competition.

(A) Statement I is true but the Statement II is false

(B) Both the Statement I and Statement II are true

(C) Statement I is false but the Statement II is true

(D) Both the Statement I and Statement II are false

28. व्यापारवाद्यांनी खालीलपैकी कशास आक्षेप घेतला असता ?

(A) मुक्त व्यापार

(B) निर्यातीस चालना देणे

(C) आयतीवर निर्बंध घालणे

(D) त्यांच्या देशाने सोन्याचा संचय करणे

29. **विधान I :**

आंतरराष्ट्रीय व्यापार एकसंघ बाजाराची निर्मिती पुरस्कृत करतो.

**विधान II :**

आंतरराष्ट्रीय व्यापारातून उद्‌भवणाऱ्या आंतरराष्ट्रीय बाजारामुळे स्पर्धेचा विपर्यास होतो.

(A) विधान I सत्य आहे पण विधान II असत्य आहे

(B) विधान I आणि विधान II दोन्ही सत्य आहे

(C) विधान I असत्य आहे पण विधान II सत्य आहे

(D) विधान I आणि विधान II दोन्ही असत्य आहे

30. Dumping occurs when :

(A) Firm charges higher price on exports than it charges domestically

(B) Firm charges lower price domestically than it charges for exports

(C) Firm charges lower price on exports than it charges domestically

(D) Firm charges different prices on exports in different countries

30. जेव्हा ................................ तेव्हा अवपुंजन होते.

(A) उद्योगसंस्था देशात आकारलेल्या किंमतीपेक्षा अधिक निर्यात किंमत आकारते

(B) उद्योगसंस्था निर्यात किंमतीपेक्षा देशांतर्गत किंमत कमी आकारते

(C) उद्योगसंस्था देशांतर्गत किंमतीपेक्षा अधिक निर्यात किंमत आकारते

(D) उद्योगसंस्था विविध देशांत विविध निर्यात किंमत आकारते

31. As per the RBI definition, money supply with the public in India ($M_1$) is defined as :

(A) Currency with the public + Deposit money with the public

(B) Currency with the public + Post office saving deposits

(C) Notes and coins in circulation

(D) Notes in circulation + demand deposits of banks

31. रिझर्व बँकेच्या व्याख्येनुसार लोकांकडील पैशाच्या पुरवठ्याची ($M_1$) व्याख्या ............ अशी केली जाते.

(A) लोकांकडील रोखता + लोकांकडील ठेवी पैसा

(B) लोकांकडील रोखता + पोष्ट ऑफिसमधील बचत ठेवी

(C) चलनातील नाणी व नोटा

(D) चलनातील नोटा + बँकाच्या मागणी ठेवी

32. .............................. is the oldest stock exchange in India.

(A) NSE

(B) ASE

(C) BSE

(D) DSE

33. In three-tier structure of co-operative credit institutions, the apex state level institution is :

(A) RBI

(B) State Co-operative Bank

(C) NABARD

(D) District Central Co-operative Bank

32. .................................. हे भारतातील सर्वात जुने आहे.

(A) एन.एस.ई.

(B) ए.एस.ई.

(C) बी.एस.ई.

(D) डी.एस.ई.

33. सहकारी पतपुरवठ्याच्या तीन स्तरीय रचनेत राज्य पातळीवरील शिखर संस्था .......................... ही आहे.

(A) आर.बी.आय.

(B) स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक

(C) नाबार्ड

(D) डिस्ट्रीक्ट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक

34. In which situation qualitative credit controls are effective in the economy ?

(A) To control inflation

(B) To control deflation

(C) To control imports

(D) To control exports

35. (*i*) RRBs were initially established in the year 1985 in India.

(*ii*) RRBs are scheduled Banks.

What can you say about these statements ?

(A) Both (*i*) and (*ii*) statements are wrong

(B) Both (*i*) and (*ii*) statements are correct

(C) Statement (*i*) is correct and statement (*ii*) is incorrect

(D) Statement (*i*) is incorrect and statement (*ii*) is correct

34. खालीलपैकी कोणत्या स्थितीत गुणात्मक पतनियंत्रण अधिक प्रभावी असते ?

(A) स्फितीची स्थिती नियंत्रण करण्यासाठी

(B) अवस्फिीतीची स्थिती नियंत्रण करण्यासाठी

(C) आयात नियंत्रणासाठी

(D) निर्यात नियंत्रणासाठी

35. (*i*) 1985 मध्ये प्रारंभी क्षेत्रीय ग्रामीण बँकाची स्थापना झाली होती.

(*ii*) क्षेत्रीय ग्रामीण बँका अनुसूचित बँका आहेत.

या विधानाविषयी आपण काय सांगाल ?

(A) दोन्ही विधाने (*i*) आणि (*ii*) चूक आहेत

(B) दोन्ही विधाने (*i*) आणि (*ii*) बरोबर आहेत

(C) विधान (*i*) बरोबर आहे आणि विधान (*ii*) चूक आहे

(D) विधान (*i*) चूक आहे आणि विधान (*ii*) बरोबर आहे

36. India ranks at the .......................... place in top producers of steel in the world.

(A) 6th

(B) 4th

(C) 5th

(D) 7th

37. Consequent to the ...................... the concept of "dominant position" in industries was introduced in India.

(A) SICA

(B) Competition Act 2002

(C) MRTP Act

(D) Industrial Policy Resolution 1956

36. पोलादाचे उत्पादन करणाऱ्या जगातील देशांमध्ये भारताचा ............................ क्रमांक आहे.

(A) 6वा

(B) 4था

(C) 5वा

(D) 7वा

37. ...................................... याचा परिणाम म्हणून "उद्योगातील प्रभावी स्थान" अशी संज्ञा भारतात वापरात आली.

(A) SICA

(B) कॉम्पिटिशन ॲक्ट, 2002

(C) मक्तेदारी आणि निर्बंधात्मक व्यापार व्यवहार कायदा

(D) औद्योगिक धोरण मसुदा 1956

38. Rank, in the descending order of their intensity, the problems of industrial development in India during the planning period :

(*i*) regional imbalance

(*ii*) unemployment

(*iii*) poor export performance

(A) (*i*), (*ii*), (*iii*)

(B) (*ii*), (*iii*), (*i*)

(C) (*iii*), (*i*), (*ii*)

(D) (*ii*), (*i*), (*iii*)

39. As per the new classification of industries the micro-enterprises should have maximum investment of Rs. .................... in manufacturing enterprises and Rs. .................... in service enterprises respectively.

(A) Rs. 10 lakhs, Rs. 5 lakhs

(B) Rs. 15 lakhs, Rs. 10 lakhs

(C) Rs. 25 lakhs, Rs. 10 lakhs

(D) Rs. 20 lakhs, Rs. 15 lakhs

38. योजना काळातील औद्योगिक विकासाच्या समस्यांचा त्यांच्या घटत्या तीव्रतेनुसार क्रम लावा :

(*i*) प्रादेशिक असमतोल

(*ii*) बेरोजगारी

(*iii*) निर्यातीची असमाधानकारक कामगिरी

(A) (*i*), (*ii*), (*iii*)

(B) (*ii*), (*iii*), (*i*)

(C) (*iii*), (*i*), (*ii*)

(D) (*ii*), (*i*), (*iii*)

39. उद्योगांच्या नव्या वर्गीकरणानुसार सूक्ष्म उद्योगसंस्थांमध्ये वस्तूनिर्माण उपक्रम असल्यास अधिकतम गुंतवणूक .......................... व सेवा उपक्रम असल्यास .......................... गुंतवणूक अनुक्रमे असणे अपेक्षित आहे.

(A) रु. 10 लाख, रु. 5 लाख

(B) रु. 15 लाख, रु. 10 लाख

(C) रु. 25 लाख, रु. 10 लाख

(D) रु. 20 लाख, रु. 15 लाख

40. Which of the following does *not* take part in the money market transactions in India ?

(1) Certificate of deposits

(2) Commercial papers

(3) 90-days treasury bills

(4) Mutual fund units

(A) (4)

(B) (3)

(C) (1)

(D) (2)

41. (*i*) As per 2011 census, 51% of India's population was urban.

(*ii*) In USA, today about 78% of population is urban.

What can you say about these statements ?

(A) Both statements (*i*) and (*ii*) are incorrect

(B) Both statements (*i*) and (*ii*) are correct

(C) Statement (*i*) is correct but statement (*ii*) is incorrect

(D) Statement (*i*) is incorrect but statement (*ii*) is correct

40. भारतातील नाणेबाजारातील व्यवहारांमध्ये खालीलपैकी कशाचा समावेश होत **नाही** ?

(1) सर्टिफिकेट ऑफ डिपॉझिट्स

(2) कमर्शिअल पेपर्स

(3) 90-दिवसांची ट्रेझरी बिले

(4) म्युच्युअल फंड युनिट्स

(A) (4)

(B) (3)

(C) (1)

(D) (2)

41. (*i*) 2011 च्या जनगणनेनुसार भारताची 51 टक्के लोकसंख्या शहरी आहे.

(*ii*) आज USA मध्ये जवळपास 78 टक्के लोकसंख्या शहरी आहे.

या विधानाविषयी आपण काय सांगाल ?

(A) दोन्ही विधाने (*i*) आणि (*ii*) चूक आहेत

(B) दोन्ही विधाने (*i*) आणि (*ii*) बरोबर आहेत

(C) विधान (*i*) बरोबर आणि विधान (*ii*) चूक आहे

(D) विधान (*i*) चूक आणि विधान (*ii*) बरोबर आहे

42. As per 2011 census, India had ...................... million plus cities and their total population accounted for ...................... of total urban population.

(A) 57, 54%

(B) 51, 61%

(C) 53, 44%

(D) 44, 53%

43. Population growth and economic development have close relationship is developed through the concept of :

(A) Demographic transition

(B) Optimum population

(C) Density of population

(D) Population trap

42. सन् 2011च्या शिरगणतीनुसार भारतात ............................ शहरे दशलक्षाहून अधिक लोकसंख्येची होती व त्यांची एकूण लोकसंख्या एकूण नागरी लोकसंख्येच्या ........................... होती.

(A) 57, 54%

(B) 51, 61%

(C) 53, 44%

(D) 44, 53%

43. लोकसंख्या वाढ आणि आर्थिक विकास यांचा परस्परसंबंध हा .................................. या संकल्पनेतून मांडलेला आहे.

(A) लोकसंख्या संक्रमण अवस्था

(B) पर्याप्त लोकसंख्या

(C) लोकसंख्या घनता

(D) लोकसंख्या सापळा

44. As per the 2001 and 2011 census of India the urban : rural population ratio was .................... and .................... respectively.

(A) 1 : 2.6, 1 : 2.2

(B) 1 : 2.5, 1 : 2.0

(C) 1 : 2.9, 1 : 2.3

(D) 1 : 2.6, 1 : 2.9

45. Which is the *correct* descending order of proportion of urban population in India as per 2011 census ?

(A) Tamil Nadu, Maharashtra, Gujrat

(B) Maharashtra, Tamil Nadu, Gujrat

(C) Tamil Nadu, Gujrat, Maharashtra

(D) Gujrat, Tamil Nadu, Maharashtra

44. भारतातील 2001 व 2011 च्या शिरगणतीनुसार नागरी : ग्रामीण लोकसंख्येचे गुणोत्तर अनुक्रमे ...................... व ...................... असे होते.

(A) 1 : 2.6, 1 : 2.2

(B) 1 : 2.5, 1 : 2.0

(C) 1 : 2.9, 1 : 2.3

(D) 1 : 2.6, 1 : 2.9

45. सन् 2011 च्या शिरगणतीनुसार भारतातील नागरी लोकसंख्येच्या उतरत्या प्रमाणाचा कोणता क्रम बरोबर आहे ?

(A) तामिळनाडू, महाराष्ट्र, गुजरात

(B) महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात

(C) तामिळनाडू, गुजरात, महाराष्ट्र

(D) गुजरात, तामिळनाडू, महाराष्ट्र

46. In India, population employed in agriculture is approximately ..................... of total Indian workforce and agricultural exports are about ..................... of total exports.

(A) 48%, 25%

(B) 54%, 14%

(C) 60%, 30%

(D) 50%, 38%

47. Which one of the following is *not* an objective of National Food Security Mission (NFSM) ?

(A) Distribution of High Yielding Variety Seeds

(B) Demonstration of improved production technology

(C) Strengthening credit facilities

(D) Popularising newly varieties of crops

46. भारतात कृषी क्षेत्रात कार्यरत असलेली लोकसंख्या एकूण श्रमसंख्येच्या अंदाजे ...................... आहे आणि एकूण निर्यातीच्या शेती उत्पादनाची निर्यात जवळपास ...................... आहे.

(A) 48%, 25%

(B) 54%, 14%

(C) 60%, 30%

(D) 50%, 38%

47. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाचे खालीलपैकी कोणते उद्दिष्ट **नाही** ?

(A) अधिक उत्पादन देणाऱ्या बियानांच्या जातींचे वितरण

(B) सुधारित उत्पादन तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक

(C) पत सुविधांचे बलकटीकरण

(D) पिकांच्या नव्या जातीं लोकप्रिय करणे

48. The classical book 'Economics of Agricultural Production and Resource Use' is written by :

(A) G.E. Foster

(B) W.W. Wilcox

(C) T.W. Schultz

(D) E.O. Heady

49. The percentage share of agriculture and allied sectors to total outlay in India's 10th, 11th and 12th five year plans was .............................. respectively.

(A) 22%, 20.7%, 18.1%

(B) 20%, 19.7%, 17.3%

(C) 23%, 20.1%, 19.5%

(D) 23.3%, 20.9%, 20.1%

48. 'इकॉनॉमिक्स ऑफ अॅग्रीकल्चरल प्रोडक्शन अँड रिसोर्स युज' या अभिजात पुस्तकाचे लेखन ................................. यांनी केले आहे.

(A) जी.ई. फॉस्टर

(B) डब्लू.डब्लू. वीलकॉक्स

(C) टी.डब्लू. शुल्झ

(D) ई.ओ. हेडी

49. शेती आणि संगत क्षेत्रांचा भारताच्या 10व्या, 11व्या व 12व्या पंचवार्षिक योजनांमधील टक्केवारी वाटा अनुक्रमे ............................ होता.

(A) 22%, 20.7%, 18.1%

(B) 20%, 19.7%, 17.3%

(C) 23%, 20.1%, 19.5%

(D) 23.3%, 20.9%, 20.1%

50. Which of the following rural schemes merged with Swarna Jayanti Gram Swarojgar Yojana ?

(A) TRYSEM and MNP

(B) DPAP and IRDP

(C) NREP and RLEGP

(D) IRDP and TRYSEM

51. The total revenue (R) and total cost (C) functions of a firm are given by :

$R = 30Q - Q^2 \quad C = 20 + 4Q$

What would be the equilibrium output of the firm ?

(A) 9

(B) 13

(C) 17

(D) 11

50. खालीलपैकी कोणत्या ग्रामीण योजनांचे सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेत विलीनीकरण करण्यात आले ?

(A) TRYSEM आणि MNP

(B) DPAP आणि IRDP

(C) NREP आणि RLEGP

(D) IRDP आणि TRYSEM

51. व्यवसाय संस्थेचे एकूण प्राप्ती (R) आणि एकूण व्यय (C) फल :

$R = 30Q - Q^2 \quad C = 20 + 4Q$

दिले असल्यास व्यवसाय संस्थेचे समतोल उत्पादन किती असेल ?

(A) 9

(B) 13

(C) 17

(D) 11

52. Non-negativity constraints in a Linear Programming problem is represented as :

(A) $X \geq 0$ and $Y \leq 0$

(B) $X \leq 0$ and $Y \geq 0$

(C) $X \leq 0$ and $Y \leq 0$

(D) $X \geq 0$ and $Y \geq 0$

52. रेषीय प्रायोजनाच्या प्रश्नात अ-ऋणात्मक संरोध खालीलपैकी कोणत्या मार्गाने दर्शविता येईल :

(A) $X \geq 0$ आणि $Y \leq 0$

(B) $X \leq 0$ आणि $Y \geq 0$

(C) $X \leq 0$ आणि $Y \leq 0$

(D) $X \geq 0$ आणि $Y \geq 0$

53. When the correlation coefficient $r = \pm 1$, then the two regression lines :

(A) Are perpendicular to each other

(B) Coincide

(C) Are parallel to each other

(D) Indeterminate

53. जेंव्हा सहसंबंध गुणांकाचे मूल्य $r = \pm 1$ असते तेव्हा दोन प्रतिपगामी रेषा ........................ असतात.

(A) परस्परांशी काटकोनी

(B) अभिन्न

(C) परस्पर समांतर

(D) अनिर्धारित

54. For accepting a null hypothesis, the computed value of a test statistic should be ........................... than the critical value.

(A) Greater

(B) Less

(C) Superior

(D) Significant

55. To compute the area under a curve we use the concept of :

(A) Differentiation

(B) Limits

(C) Integration

(D) Probability

54. रिक्त परिकल्पना स्वीकारायचे असल्यास, मापन करण्यात आलेले सांख्यिकी चांचणी मूल्य हे निर्णायक मूल्यापेक्षा .........................

(A) जास्त असावे

(B) कमी असावे

(C) श्रेष्ठ प्रतीचे असावे

(D) लक्षणीय असावे

55. वक्राच्या खालील क्षेत्र मापन करावयाचे असल्यास आपण खालीलपैकी कोणत्या संकल्पनेचा उपयोग करतो ?

(A) व्यवच्छेदन

(B) मर्यादा

(C) समाकलन

(D) संभाव्यता

56. The precision of OLS estimator is measured by their :

(A) Mean

(B) Mode

(C) Standard errors

(D) Sign

57. Which one of the following is *not* a part of classical assumptions, in regression analysis ?

(A) Values taken by dependent variable Y is fixed in repeated sampling

(B) Regression model is linear in parameters

(C) Error term has zero mean

(D) Error term has a constant variance

56. ओ.एल्.एस्. प्रतिदर्शजाचे नेमकेपणा .......... च्या साहाय्याने मोजतात.

(A) मध्य

(B) बहुलक

(C) प्रमाणदोष

(D) चिन्ह

57. प्रतिपगमन विश्लेषणात खालीलपैकी कोणते गृहीत अभिमत गृहीताचा भाग **नाही** ?

(A) पुनरावृत्ती नमुन्यात Y या अवलंबित चलाचे मूल्य हे स्थिर असते

(B) प्राचलांच्या बाबतीत प्रतिपगमन प्रतिमान रेषीय असते

(C) प्रमाद पदाचे सरासरी मूल्य शून्य असते

(D) प्रमाद पदाचे विचरण स्थिर असते

58. If the estimated $\hat{\beta}_2$ is equal to the hypothesized $\beta_2$, the '$t$' value will be equal to :

(A) 0

(B) 1

(C) 30

(D) Standard error of $\hat{\beta}_2$

59. Which of the following are plausible approaches to dealing with a model that exhibits 'heteroscedasticity' ?

(*i*) Take logarithms of each of the variables

(*ii*) Use suitably modified standard errors

(*iii*) Use generalised least squares procedure

(*iv*) Add logged values of the variables to the regression equations

(A) (*ii*) and (*iv*) only

(B) (*i*) and (*iii*) only

(C) (*i*), (*ii*) and (*iii*) only

(D) (*i*), (*ii*), (*iii*) and (*iv*)

58. $\hat{\beta}_2$ चे प्राक्कलित मूल्य परिकल्पित $\beta_2$ शी बरोबर असल्यास '$t$' चे मूल्य खालीलपैकी कोणते राहील ?

(A) 0

(B) 1

(C) 30

(D) $\hat{\beta}_2$ चे प्रमाणीकृत प्रमाद

59. अनेकविध प्रकीर्ण प्रतिमानाशी निगडित पुढीलपैकी कोणते दृष्टिकोन विश्वसनीय आहेत ?

(*i*) प्रत्येक चलाचा लॉगॅरिथम घ्या

(*ii*) सोईस्कररित्या सुधारित प्रमाण-दोष वापरा

(*iii*) सामान्य लघुत्तमवर्ग पद्धती वापरा

(*iv*) समाश्रयण समीकरणामध्ये चलाचे लॉगरिथम मिसळा

(A) फक्त (*ii*) आणि (*iv*)

(B) फक्त (*i*) आणि (*iii*)

(C) फक्त (*i*), (*ii*) आणि (*iii*)

(D) (*i*), (*ii*), (*iii*) आणि (*iv*)

60. Non-stationary time series is one with :

(A) Time varying mean

(B) Time varying variance

(C) Both (A) and (B)

(D) Time invariant mean and variance

61. What can you say about the following statements ?

(*i*) Cournot's duopoly model assumes homogeneous product of producers.

(*ii*) Cournot assumes price of the rival producer constant.

(A) Both statement (*i*) and statement (*ii*) are incorrect

(B) Both statement (*i*) and statement (*ii*) are correct

(C) Statement (*i*) is incorrect and statement (*ii*) is correct

(D) Statement (*i*) is correct and statement (*ii*) is incorrect

60. अस्थिर कालमालेमध्ये खालीलपैकी ............ दिसून येते.

(A) कालनिहाय बदलणारे मध्य

(B) कालनिहाय बदलणारे प्रचरण

(C) (A) आणि (B) दोन्हीही

(D) कालनिहाय न बदलाणारे मध्य आणि प्रचरण

61. खालील विधानांबाबत तुम्ही काय सांगाल ?

(*i*) कुर्नोच्या द्विविक्रेता प्रतिमानामध्ये उत्पादकांचा एकजिनसी वस्तू गृहीत धरलेली असते.

(*ii*) स्पर्धक उत्पादकाच्या किंमती स्थिर असतात असे कुर्नोने गृहीत धरले आहे.

(A) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही चूक आहेत

(B) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही बरोबर आहेत

(C) विधान (*i*) चूक व विधान (*ii*) ही बरोबर आहे

(D) विधान (*i*) बरोबर व विधान (*ii*) ही चूक आहे

62. In case Reserve Bank starts selling government bonds, then :

(A) LM curve shifts to the left

(B) LM curve becomes vertical

(C) LM curve becomes horizontal

(D) LM curve shifts to the right

62. रिझर्व्ह बँकेने जर रोख विक्रीस प्रारंभ केला तर :

(A) LM वक्र डाव्या बाजूला सरकेल

(B) LM वक्र क्षितिजलंब होईल

(C) LM वक्र क्षितिजसमांतर होईल

(D) LM वक्र उजव्या बाजूला सरकेल

63. If the investment function becomes interest inelastic at a low rate of interest, the corresponding IS curve becomes :

(A) Horizontal

(B) Upward sloping

(C) Vertical

(D) Flatter

63. गुंतवणूक फल व्याजदराशी अलवचीक झाल्यास, संबंधित IS वक्र कसा होईल ?

(A) समस्तरीय

(B) चढता वक्र

(C) क्षितिजलंब

(D) पसरट

64. **Statement I :**

Oligopoly is a situation where a few large firms compete against each other.

**Statement II :**

Under oligopoly there is an element of interdependence in the decision-making of competing firms.

(A) Statement I is true but the Statement II is false

(B) Statement I is false but the Statement II is correct

(C) Both the Statement I and Statement II are correct

(D) Both the Statement I and Statement II are false

65. Monopoly power refers to the :

(A) Restraints imposed by the competitors on each other

(B) Restraints imposed over competitors by the price maker

(C) Restraints imposed on the quantity of production by each other

(D) Restraints imposed on prices of production of each other

64. **विधान I :**

अल्पजनाधिकार ही अशी अवस्था आहे की जेथे काही थोड्या मोठ्या उत्पादन संस्था एकमेकांशी स्पर्धा करत असतात.

**विधान II :**

अल्पजनाधिकारांतर्गत परस्पर स्पर्धक संस्थाच्या निर्णय प्रक्रियेत परस्परावलंबीत्व घटक अंतर्भूत असतो.

(A) विधान I बरोबर आहे परंतु विधान II चूक आहे

(B) विधान I चूक आहे परंतु विधान II बरोबर आहे

(C) विधान I व विधान II ही दोन्ही विधाने बरोबर आहेत

(D) विधान I व विधान II ही दोन्ही विधाने चूक आहेत

65. एकाधिकार शक्ती म्हणजे :

(A) स्पर्धकांनी एकमेकांवर लादलेली बंधने

(B) किंमत निर्धारकाने स्पर्धकांवर लादलेली बंधने

(C) एकमेकांच्या उत्पादन नगसंख्येवर लादलेल्या मर्यादा

(D) एकमेकांच्या उत्पादन किंमतीवर लादलेल्या मर्यादा

66. Offshore currency deposits are usually referred to as :

(A) Euro bonds

(B) Euro currencies

(C) Euro banks

(D) Euro deposits

67. According to the Product Cycle Hypothesis, innovation leads to ................................ for the innovating country.

(A) absolute monopoly

(B) relative monopoly

(C) temporary monopoly

(D) long-term monopoly

66. विदेशी चलन ठेवींना सहसा .................. असे म्हटले जाते.

(A) युरो रोखे

(B) युरो चलने

(C) युरो अधिकोष

(D) युरो ठेवी

67. वस्तू चक्र परिकल्पनेनुसार नवप्रवर्तनामुळे नवप्रवर्तक देशाला .............................. प्राप्त होते.

(A) केवल मक्तेदारी

(B) सापेक्ष मक्तेदारी

(C) तात्पुरती मक्तेदारी

(D) दीर्घकालीन मक्तेदारी

68. Hedging refers to :

(A) The acceptance of foreign exchange risk

(B) The covering of foreign exchange risk

(C) Foreign exchange arbitration

(D) Foreign exchange speculation

69. Name the Economist represented United States at the Bretton Woods Conference :

(A) Marriner S. Eccles

(B) Paul A. Samuelson

(C) John Maynard Keynes

(D) Harry Dexter White

68. बचाव म्हणजे :

(A) परकीय विनिमय जोखीम स्वीकारणे

(B) परकीय विनिमय जोखिमीवर उपाययोजना करणे

(C) परकीय विनिमय लवाद

(D) परकीय विनिमय सट्टेबाजी

69. ब्रिटन वुडस् परिषदेत युनायटेड स्टेटचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अर्थतज्ञाचे नांव सांगा :

(A) मॅरिनर एस. एक्लेस

(B) पॉल ए. सॅम्यूअलसन

(C) जॉन मेनार्ड केन्स

(D) हॅरी डेक्स्टर व्हाइट

70. **Statement I :**

Prior to Greek debt crisis, many German banks helped finance Greece's debt and Greece knew very well that the IMF and the Western States would have to use bailout funds to bear the lost of Greece's failure.

**Statement II :**

The idea of single currency market had an unrealistic assumption of perfect information and ignored that in real world information is imperfect.

(A) Both the Statements I and II are correct and Statement II is the reason for Statement I

(B) Both the Statements I and II are correct and Statement I is the reason for Statement II

(C) Both the Statements I and II are correct but no statement is reason to the other

(D) Statement I is correct but Statement II cannot be the reason for Statement I

70. **विधान I :**

ग्रिसच्या कर्जसंकटापूर्वी अनेक जर्मन बँकानी ग्रिसचा कर्जास वित्तपुरवठा केला होता आणि ग्रिसला याची पूर्ण कल्पणा होती की आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि पाश्चिमात्य सरकारांना ग्रिसच्या अपयशाची किंमत कर्जसंकट निर्मूलन निधीद्वारे चुकती करावी लागेल.

**विधान II :**

सामायिक चलनाची कल्पणापूर्ण माहितीच्या अवास्तव गृहीतकावर आधारित होती आणि त्यामुळे वास्तव जगात माहिती नेहमी अपूर्ण असते या वास्तवाकडे दुर्लक्ष झाले.

(A) दोन्ही विधाने I आणि II बरोबर आहेत आणि विधान II हे विधान I चे कारण आहे

(B) दोन्ही विधाने I आणि II बरोबर आहेत आणि विधान I हे विधान II चे कारण आहे

(C) दोन्ही विधाने I आणि II बरोबर आहेत परंतु यापैकी कोणतेही विधान एक दुसऱ्यास कारणे असू शकत नाही

(D) विधान I बरोबर आहे परंतू विधान II हे विधान I चे कारण होवू शकत नाही

71. The upper and lower Minimum Wage Rates which are applicable for Agricultural labourers fixed by the Central Government as on 31-12-2013 were :

(A) Rs. 465.00 and Rs. 186.00

(B) Rs. 437.00 and Rs. 165.00

(C) Rs. 439.00 and Rs. 195.00

(D) Rs. 432.00 and Rs. 188.00

72. Which one of the following is *not* the salient feature of the APMC Model Act, 2003 ?

(A) Permission to farmers to establish new markets in any area.

(B) No compulsion to farmers to sell their produce through existing regulated markets.

(C) Setting up of farmers-consumer markets for direct sale.

(D) To facilitate processing at the place of marketing and promote exports.

73. In Indian agriculture farm size and productivity show :

(A) Inverse relationship

(B) Positive relationship

(C) Neither inverse nor positive relationship

(D) Fluctuating relationship

71. केंद्र सरकारने दिनांक 31-12-2013 रोजी निर्धारित केलेले कमाल व किमान वेतन दर की जे कृषी श्रमिकांना लागू आहेत ते ................ व ................ होते.

(A) रु. 465.00 व रु. 186.00

(B) रु. 437.00 व रु. 165.00

(C) रु. 439.00 व रु. 195.00

(D) रु. 432.00 व रु. 188.00

72. खालीलपैकी कोणते कृषी उत्पन्न बाजार समिती नमुना कायदा 2003 चे विशेष लक्षण **नाही** ?

(A) कोणत्याही भागात नवीन बाजार सुरू करण्याची शेतकऱ्यांना मुभा

(B) अस्तित्वात असणाऱ्या नियंत्रित बाजारपेठांस कृषी उत्पादन विकण्याची शेतकऱ्यांवर सक्ती नाही

(C) प्रत्यक्ष विक्रीकरिता शेतकरी-उपभोक्ते बाजार स्थापन करणे

(D) विक्रीच्या ठिकाणी प्रक्रिया करण्याची सोय करून निर्यात प्रोत्साहन देने

73. भारतीय कृषीत धोरणक्षेत्राचे आकारमान आणि नफा क्षमता यांचा :

(A) विरुद्ध संबद्ध आहे

(B) सहसंबद्ध आहे

(C) विरुद्ध अथवा सहसंबद्ध नाही

(D) चढउताराचा सहसंबद्ध आहे

74. What can you say about the following statements ?

    (*i*) NABARD was established in July 1982 for taking over the functions of Agricultural Refinance and Development Corporation (ARDC).

    (*ii*) NABARD extends refinancing facilities to all scheduled banks in India.

    (A) Statement (*i*) is correct and statement (*ii*) is incorrect

    (B) Statement (*i*) is incorrect and statement (*ii*) is correct

    (C) Both the statements (*i*) and (*ii*) are correct

    (D) Both the statements (*i*) and (*ii*) are incorrect

75. As per the views of the National Advisory Council, the food security legislation 2013 was expected to cover ........................... population of country.

    (A) 68 percent

    (B) 75 percent

    (C) 83 percent

    (D) 89 percent

74. खालील विधानांबाबत तुम्ही काय म्हणाल ?

    (*i*) कृषी पुनर्वित्त आणि विकास निगमची कार्ये स्वीकारण्यासाठी नाबार्डची स्थापना जूलै 1982 मध्ये करण्यात आली.

    (*ii*) भारतातील सर्व अनुसूचित बँकाना नाबार्ड पुनर्वित्त सेवा पुरवीते.

    (A) विधान (*i*) बरोबर आहे आणि विधान (*ii*) चूक आहे

    (B) विधान (*i*) चूक आहे आणि विधान (*ii*) बरोबर आहे

    (C) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत

    (D) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही विधाने चूक आहेत

75. राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या दृष्टिकोणान्वये 2013 चा अन्न सुरक्षा कायदा देशाच्या ................ एवढ्या लोकसंख्येला अंतर्भूत करणे अपेक्षित होता.

    (A) 68 टक्के

    (B) 75 टक्के

    (C) 83 टक्के

    (D) 89 टक्के

ROUGH WORK